# मिरा भाईंदर महानगरपालिका

**क्रिडा विभाग (नाटयगृह)**
**भारतरत्न गानसम्राज्ञी. स्व. लता मंगेशकर नाटयगृह,**
**तळ मजला, दहिसर चेकनाक्याजवळ, महाजन वाडी,**
**मिरारोड (पू.) ता.जि.ठाणे. 401107.**
जा.क्र.मनपा/नाटयगृह/ 73 /2025-26
दिनांक :- 21/05/2025

प्रति,
**मा. माहिती व जनसंपर्क अधिकारी,**
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी / बातम्यांचा खुलासा सादर करणेबाबत.**

**संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/मावज/02/2024-25, दि.04/04/2025 रोजीचे पत्र (E-4874052)**
**2) जा.क्र.मनपा/मावज/38/2025-26, दि.08/05/2025 रोजीचे स्मरणपत्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रिडा विभागाअंतर्गत भारतरत्न गानसम्राज्ञी. स्व. लता मंगेशकर नाटयगृह हे विविध कार्यक्रमांकरीता सुरु असून रसिक प्रेक्षकांचा नाटयगृहाच्या कार्यक्रमाकरीता उत्तम प्रतिसाद आहे.

संदर्भिय विषयांन्वये दि.03/04/2025 व दि.04/04/2025 रोजी अनुक्रमे दै. पुण्यनगरी व दै.ग्लोबल टाईम्स आणि दै. प्रतिष्ठा ठाणे टाईम्स या वर्तमानपत्रांमध्ये "नाटयगृहाच्या पार्किंगमध्ये बाटल्यांचा पसारा" या मथळयाखाली बातमी प्रसिद्ध झालेली आहे.

वरील नमूद बातमीनुसार नाटयगृह पार्किंगमध्ये व संपूर्ण नाटयगृह हे दैनंदिन साफ-सफाई होत असते. बातमी दरम्यान कोणत्याही प्रकारचे "दारु बॉटल" आढळून आलेली नाही. त्याचप्रमाणे महापालिका आस्थापना विभागातून जा.क्र.मनपा/आस्था/34/2025-26 दि.03/04/2025 रोजी कार्यरत 2 सुरक्षा रक्षक यांना नाटयगृह पार्किंग येथे सुद्धा पर्यवेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

**(आनंद गभाले)**
व्यवस्थापक (नाटयगृह)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\नाटयगृह\LETTER ALL\Letter - माहिती व जनसंपर्क अधिकारी - वृत्तपत्रातील बातम्यांचा खुलासा.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/ 35 /2025-26 दि. 03/ 04 /2025

प्रति,

श्री.सचिन जांभळे

ई-मेल - jambhalesachin750@gmail.com

विषय :- भारतरत्न गानसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर नाट्यगृह, मिरारोड येथील सुरक्षा रक्षकांबाबत

संदर्भ :- आपला DIS/URDM/THAN/2025/822, दि.01/04/2025 रोजीचा तक्रार अर्ज.

विषयांकित प्रकरणी आपण आपले सरकार पोर्टलवर भारतरत्न गानसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर नाट्यगृह, मिरारोड येथील दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांना उचित कार्यवाही करणेबाबत लेखी पत्र दिले आहे. पत्राची प्रत सोबत जोडून देण्यात येत आहे, ही विनंती.

(अन्सेलना चिंचक)

कार्यालयीन अधीक्षक

आस्थापना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

दि.03 / 04 /2025

जा.क्र.मनपा/आस्था/ 34 /2025-26

प्रति,
मुख्य सुरक्षा पर्यवेक्षीय अधिकारी,
महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन,
32 वा मजला, सेंटर-1, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई-400005

विषय :- श्री.सचिन जांभळे यांनी केलेल्या तक्रारीबाबत.
संदर्भ :- तक्रारीचे टोकन क्र.:- DIS/URDM/THAN/2025/822
तक्रारदाराचे नाव - श्री.सचिन जांभळे
ई-मेल - jambhalesachin750@gmail.com
तक्रार दि.01/04/2025

भारतरत्न गानसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर नाटयगृह, मिरारोड येथील पार्किंग ठिकाणी सुरक्षा रक्षक नसल्याने तेथे दारूच्या बाटल्या आढळून येत असल्याबाबत आपले सरकार पोर्टलवर तक्रार प्राप्त झालेली आहे.

आपल्या मंडळाकडून भारतरत्न गानसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर नाटयगृह, मिरारोड येथे सद्यस्थितीत एका पाळीत 2 याप्रमाणे तीन पाळीत एकूण 6 सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यात येत आहेत. सदरचे सुरक्षारक्षक हे नाटयगृहाच्या गेट जवळ व नाटयगृहाच्या आत सुरक्षेचे कर्तव्य बजावीत आहेत.

तरी नाट्यगृह येथील एका पाळीत कार्यरत असलेले 2 सुरक्षारक्षक यांना नाट्यगृहाच्या पार्किंग येथे सुद्धा पर्यवेक्षण करण्याचे निर्देश द्यावेत.

(अन्सेलमा चिंचक)
कार्यालयीन अधीक्षक
आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका